# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ०३/०५/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **मे महिन्याची सर्वसाधारण मासिक सभा, शुक्रवार, दिनांक १० मे, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. (अ) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एक दलित वस्ती मधून निवडून आलेल्या सदस्यांपैकी एक महिला नगरसेविका व एक नगरसेवक सदस्याची नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा जिल्हास्तरीय समितीवर नियुक्ती करणे.

(ब) नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने दोन सदस्यांची हात वर करुन साध्या बहुमताने निवड करणे.

२. इतिवृत्त कायम करणे.

३. प्रश्नोत्तरे.

**महिला व बालकल्याण समिती मधील ठराव :**

४. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समिती अतर्गत कल्याणकारी योजना राबविणे.

**समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती मधील ठराव :**

५. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात खुला प्रवर्ग तसेच दगडखाण/बांधकाम/रेती/नाका कामगार यांच्या करिता योजना राबविणे.

६. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात स्थानिक प्रकल्पग्रस्त तसेच महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई कामगार व कंत्राटी कामगारांकरिता कल्याणकारी योजना राबविणे.

७. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती अतर्गत कल्याणकारी योजना राबविणे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

*८. भुखंड क्र.१२ए, सेक्टर-१५, नेरुळ येथील मंडई विकासाच्या मंजुर प्रस्तावाचा फेरविचार करणे.

९. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सदयस्थितीत कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी सेवा सुविधांचा अभाव असल्यामुळे "कर्करोग रुग्णांसाठी उपचारात्मक व प्रतिबंधात्मक सेवा" पुरविणे.

**ठरावाच्या सूचना :**

**१० ते १२. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(१०) नवी मुंबई हद्दीत सिडको तर्फे प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेल्या भुखंडाना बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाण पत्र (ओसी/सीसी) नाममात्र दराने देणे. (११) नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणा-या शाळांना सि.बी.एस.ई. च्या धर्तीवर अभ्यासक्रम सन २०१३ पासुन चालू करणे. (१२) नमुंमपाच्या हद्दीमध्ये एन. एम. एम. टी. मार्फत शाळेच्या वेळेमध्ये विद्यार्थ्यांना मोफत बस सेवा देणे.

**१३ ते १५. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(१३) प्र. क्र. २० अंतर्गत गोठीवली गांवातील समाज मंदीराचे नुतनिकरण करणे. (१४) प्र. क्र. २० अंतर्गत तलवली गावांमध्ये नवीन समाज मंदिर बांधणे. (१५) प्र. क्र. २० अंतर्गत रबाले सिध्दार्थ नगर मध्ये नवीन व्यायाम शाळा बांधणे.

**१६. सौ. रेखा विनोद म्हात्रे, यांजकडून :-**

नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील ज्येष्ठ भजनी कलावंत, वारकरी, पांरपारिक गिते, गाणारे कलावंत, किर्तनकार, शाहीर यांना नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे त्यांचा सन्मान म्हणुन शासनाच्या धर्तीवर मानधन चालु करणे.

**१७ ते १९. सौ. राधा भुवन ठाकुर, यांजकडून :-**

(१७) प्र. क्र. ८५, दिवाळे येथे से. १५ मध्ये साई विहार ते साई रेजसी येथे नवीन गटर व पदपथ बांधणे. (१८) प्र. क्र. ८५, दिवाळे येथे नाखवा बिल्डिंग ते तुळशी बिल्डिंग पर्यत आर. सी. सी. गटार व इंटर लॉक पदपथाची सुधारणा व दुरुस्ती करणे. (१९) प्र. क्र. ८५, बेलापूर बँक ऑफ इंडिया समोरील व अंगणवाडी ते काजी सर्व्हिसिंग सेंटर पर्यतच्या गटाराची दुरुस्ती, इंटर लॉक व पदपथाची सुधारणा करणे.

**२०. श्री. मधुकर बाबू मुकादम, यांजकडून :-**

प्र. क्र. ४०, मधील पावणे गावचे माजी सरपंच कै. रामदास नारायण पाटील यांचे काही महिन्यापुर्वी निधन झाले असून पावणे गावातील पावणेश्वर शिवमंदिरासमोर त्यांचे स्मारक बनविणे.

**२१ व २२. सौ. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-**

(२१) प्र. क्र. ७३, मधील से. १३ आणि से. १९ मधील जाणाऱ्या मुख्य नाल्याची दुरावस्था झाली असून त्यांची सफाई करुन त्यावर वाशी से. १५ येथे नाला बंदिस्त करुन त्यावर पार्किग बनविले आहे. त्याप्रमाणे (SAME) नाला बंदिस्त करुन त्यावर पार्किग बनविणे. (२२) प्र. क्र. ७३, नेरुळ येथील मुंबई-पुणे हायवे वरील स्टेट बॅक वसाहत व बॅक ऑफ इंडिया वसाहत आहे. तेथील नागरिकांना हायवे ओलांडण्याकरिता खूप त्रास होतो. तरी हायवे वरील दोन्ही बाजूस सिंग्नल(SIGNAL) यंत्रणा बनविणे.

**२३ ते २५. श्री. प्रभाकर गोमा भोईर, यांजकडून :-**

(२३) प्र. क्र. ४५, येथील एम के प्लायवूड ते जूहूगाव प्रवेशद्वार पर्यतच्या गटाराची व पदपथाची दुरुस्ती व सुधारणा करण्यात यावी. (२४) प्र. क्र. ४५, मधील जूहूगाव बाबा आर्केड ते होल्डींग पॉंड पर्यतच्या गटाराची दुरुस्ती व पदपथाची सुधारणा करणे. (२५) प्र. क्र. ४५, मधील जूहूगाव प्रदिप पाटील ते अनिल भोईर यांच्या घरापर्यतच्या गटाराची व फुटपाथची सुधारणा करणे.

**२६ ते २८. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**

(२६) प्र. क्र. २२, महापे अंतर्गत येणाऱ्या अडवली-भुतवली येथील आदिवासी लोकांना योजना विभागामार्फत घरांची पुर्नबांधणी आहे त्याच ठिकाणी करणे. (२७) प्र. क्र. २२, महापे गावानजीक असलेल्या स्मशानभुमी जवळ हायमास्ट बसविणे. (२८) प्र. क्र. २२, महापे मधील अडवली-भुतवली येथे समाजमंदिर बांधून देणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ०३ मे २०१३.**